ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH – APRIL 2023

Original Research Article

# महिला सक्षमीकरण शासन योजना : एक दृष्टिक्षेप

*** डॉ.दयाराम दुधाराम पवार,**

* सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक

**सारांश:**

*घरकामगार, मानव समूहात जवळपास निम्मा हिस्सा हा स्त्री जातीचा आहे. आजची स्त्री ही वैज्ञानिक, अधिकारी, शिक्षिका, उद्योजिका अशा विविध स्तरावर सक्षमपणे कार्ये करीत आहे. स्वतःच्या कर्तुत्वाने चमक दाखवून ती आत्मसन्माने प्रत्येक क्षेत्रात ती उंच झेप घेत आहे. पण तरी देखील तिचा सर्वांगीण विकास पाहीजे तेवढ्या प्रमाणात झालेला नाही. यासाठी महिला सक्षमीकरण गरजेचे आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांचा सामाजिक, आर्थिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, मानसिक आणि राजकीय क्षेत्रातील विकास होय. महिलांना त्यांचे अधिकार आणि हक्क प्राप्त व्हावे यासाठी शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गाने त्यांना मदत व प्रोत्साहन देत असते. तिचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे . जेव्हा एखादी स्त्री मानसिकदृष्ट्या सक्षम बनते तेव्हाच ती कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करू शकते. त्यासाठी महिलांना त्यांच्या कुटुंबाकडूनच साथ मिळाली पाहिजे. जेणेकरून ती आपल्या कार्यक्षेत्रात अजूनही पुढे जाऊन उंच झेप घेऊ शकेल. स्त्रीने आरोग्य सुदृढतेबरोबरच मानसिक सुदृढतेसाठी जागरूक राहावयास पाहिजे. शिक्षणाद्वारे तिला योग्य अयोग्य ठरविण्याची तिची क्षमता विकसीत होणे आवश्यक आहे. त्यामुळे महिलांना समृध्द करणेसाठी तिच्या क्षमतांचा विकासासाठी सक्षमीकरण करण्याची नक्कीच आवश्यकता आहे. यासाठी शासन स्तरावर विविध धोरणे व विविध योजना राबवित आहे. त्या शासकीय योजनांचा आढावा सदर लेखात घेण्यात आलेला आहे.*

**मुख्य शब्द :** *महिला सक्षमीकरण, शासकीय योजना, सर्वांगीण विकास.*

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रस्तावना:-**

मानव समूहात जवळपास निम्मा हिस्सा हा स्त्री जातीचा आहे. महिला ही आधीपासूनच सशक्त आहे. तिची बुद्धी ,शौर्य शक्तीची प्रचिती ही वंदनीय आहे. परंतु बदललेल्या परिस्थितीमुळे ती तिच्या शक्ती स्वरूपाची परिभाषा बदललेली आहे म्हणून असे म्हणता येईल की महिला सशक्तिकरण हे आधुनिक नसून पौरानिकच आहे. बदलत्या परिस्थितीनुसार ती मुलगी, माता, पत्नी, सून या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

भूमिकासोबतच वैज्ञानिक, अधिकारी, शिक्षिका, उद्योजिका अशा अनेक स्वरूपात कार्ये करतांना दिसून येते. या सर्व भूमिकांना तिने स्वतःच्या कर्तुत्वाने चमक दिलेली आहे. तिच्या आत्मसन्मानाला तिने एक नवीन दिशा देऊन प्रत्येक क्षेत्रात ती उंच झेप घेत आहे. पण तरी देखील असे दिसून येते की तिला अजून बरेच प्रयत्न करायचे आहेत. तिने तिचा विकास घडवून आणला असला तरी तिचा सर्वांगीण विकास अजून झालेला नाही त्यासाठी महिला सक्षमीकरण करणे गरजेचे आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांचा सामाजिक, आर्थिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, मानसिक आणि राजकीय क्षेत्रात विकास घडवून आणणे होय.कारण सक्षम महिलांमुळेच सक्षम समाज निर्माण होतो. त्यामुळेच महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचे सर्वांगीण सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. महिलांना त्यांचे अधिकार आणि हक्क प्राप्त व्हावे यासाठी शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गाने त्यांना मदत व प्रोत्साहन देत असते. यासाठी शासन स्तरावर विविध धोरणे राबविले जातात. राज्यातील महिला स्वावलंबी व्हावात त्यांचा विकास व्हावा तसेच त्या स्वयंस्फूर्तीने कुटूंब, समाज व देशाच्या विकास कामात सहभागी व्हाव्यात यासाठी स्त्रीचा विकासासाठी शासकीय स्तरावर विविध योजना राबवीत आहे.

**महिला विषयक धोरण:**

महाराष्ट्र राज्याचे पहिले महिला धोरण २२ जून १९९४ साली जाहीर झाले.देशात महिला धोरण आणणारे महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे. त्या पाठोपाठ दुसरे २००१, तिसरे २०१३ मध्ये महिला धोरण आले. आता चौथे धोरण २०२३ मध्ये येऊ घातलेले आहे.या विविध धोरणामुळे महिलांच्या जीवनामध्ये काही महत्त्वाचे बदल घडून आलेत व येणार आहेत. (महिलांच्या मुक्तीचा जाहीरनामा असे या पहिल्या धोरणाचे वर्णन केलं गेलं होतं आणि ते बऱ्याच अंशी खरही होतं) शासकीय पातळीवरुन राबविण्यात येणाऱ्या धोरणामुळे मुलींना वडिलांच्या संपत्तीत वाटा देण्याचा कायदा मंजूर करण्यात आला. पोटगी विषयक कायद्यात सुधारणा झाली. महिला आर्थिक विकास मंडळाच्या माध्यमातून बचत गटांना चालना मिळाली. मुलींच्या प्रगती पुस्तकावर आईचे नाव लावण्यात येऊ लागले. ग्रामपंचायतीत महिला लोकप्रतिनिधींना अधिक अधिकार, नियोजनात महिलांचा सहभाग असे अनेक निर्णय झालेत. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाचा निर्णय घेतला गेला. तसेच स्व उत्पन्नातील दहा टक्के निधी महिला व बालकल्याणासाठी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. महिलांच्या कायदेविषयक मदतीसाठी राज्य महिला आयोग स्थापन झाले. प्रॉपर्टी कार्ड व इतर मालमत्ता संबंधित कागदपत्रात महिलांची नावे पुरुषांच्या बरोबरीने आलेली आहे. रोजगार हमी, कार्ड व रेशनकार्ड यावर कुटुंबप्रमुख म्हणून स्त्रियांची नावे नोंदवण्याची पद्धत सुरू झाली आहे. केंद्राचा निर्भय कायदा आला. मुलींच्या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

लैंगिक शोषणाविरोधात पॉस्को कायदा तयार करण्यात आला. असे विविध कायदे राज्यात दिशा कायदा झाला. असे अनेक महिलांच्या संरक्षणार्थ कायदे असूनही महिला कितपत सक्षम आणि सुरक्षित आहेत हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

चौथे महिला धोरण २०२२ मध्ये विधिमंडळात महिला धोरणाचा मसुदा जाहीर झाला होता. त्या अनुषंगाने ८ मार्च रोजी महिला दिनाच्या निमित्ताने विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात महिला धोरण तयार करण्याच्या अनुषंगाने चर्चा झाली. त्यात महिला व पुरुष सदस्यांनी आपली मते मांडली. महिलांसाठी स्वच्छतागृहांची सोय, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात वाढ, महिलांना समान वेतन, महिलांसाठी कौशल्य विकासाच्या उपक्रमांची गरज, सॅनिटरी पॅडचा अत्यल्प दरात पुरवठा , मुलींमध्ये लैंगिक शोषणाबाबत, आरोग्य विषयक जागृती , लोकसभेत महिलांना आरक्षण, विधवा व परितक्त्या महिलांसाठी योजना, आरोग्य सेविकांना निवृत्ती वेतन, महिला उद्योजकांना प्रोत्साहन, महिलांसाठी सुरक्षित वाहतूक सेवा व अशा अनेक महिलांशी संबंधित मुद्दे चर्चेत पुढे आले. त्याअनुषंगाने नवीन महिला धोरणात अनेक नवीन योजना महिलांसाठी प्रत्यक्षात येथील अशी आशा आहे. नवीन महिला धोरणाची चर्चा सुरू असताना मागील तीन धोरणाच्या अंमलजबावणीचा आढावा घेणे देखिल गरजेचे वाटते. कारण धोरणाच्या किती बाबी अंमलबजावणीसाठी सरकारच्या पटलावर आल्यात , त्यासाठी किती आर्थिक तरतूद झाली, आणि पुढील धोरण आखत असताना मागील धोरणाची नेमके काय झाले याचाही मागोवा घेणे महत्त्वाचे ठरते.

**महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय स्तरावरील विविध योजना:**

- **लेक लाडकी योजना:**

राज्यात मुलींचा जन्मदर वाढावाव सुधारावा याकरीता लेक लाडकी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये मुलींच्या जन्मापासून ते अठरा वर्ष वयापर्यंतच्या मुलींच्या नावे राज्यशासनाकडून आर्थिक रक्कम मुलीच्या खात्यात जमा केली जाते. यामध्ये वयोमानाच्या टप्प्यानुसार मुलगी सज्ञान होईपर्यंत ९८ हजार रुपये जमा होणार आहे. मुलगी शाळेत जायला लागल्यापासून तर ती १८ वर्षाची होईपर्यंत मुलीच्या खात्यात रक्कम जमा होईल. सदर योजना पिवळया व केशरी कार्डधारकांच्या कुटुंबातील मुलींसाठी आहे. त्यामुळे मुलींच्या शिक्षण पालनपोषणाचा खर्च करणे सोपे होणार आहे या योजनेमुळे मुलींना व तिच्या पालकांना आर्थिक फायदा मिळणार आहे .या पैशातूनच मुलींच्या शिक्षण पूर्ण करण्याची मानसिकता वाढीस लागेल त्यामुळे मुलींना सन्मान प्राप्त होईल.

- **महासमृद्धी महिला सक्षमीकरण:**

राज्यात ही योजना ८ मार्च २०२१ ला सुरू करण्यात आली आहे. महिलांच्या आत्मसन्मान वाढवण्यासाठी शेती व घर दोघांच्याही नावे सातबारा उताऱ्यावर पती सोबत पत्नीचे

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

नावही लावण्यात यावे. गाव पातळीवर राबविण्यात येणाऱ्या विकासाच्या विविध योजनांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे ,महिलांमध्ये तंबाखू,मिशरीमुक्तीबाबत जनजागृती करणे याचा समावेश आहे.

- **महिला बचत गट:**

आज शासनाच्या मदतीने बचत गटांच्या माध्यमातून महिला स्वबळावर उभ्या राहत आहे. बचत गटामुळे महिलांचा विकास होत आहे. काही महिलामध्ये आत्मविश्वास निर्माण होवून त्या बोलक्या होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत. जिद्द , मेहनत धाडस या बळावर उद्योग व्यवसायातून महिला या यशस्वीपणे समृद्धी खेचून आणता येऊ शकते हे महिलांना बचत गटामुळे समजले आहे. त्यामुळे महिला आर्थिकदृष्ट्या बळकट होत आहे

- **इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना:**

पीडित महिलांसाठी इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना सुरू करण्यात आली आहे. पीडित महिलेचे पूर्णपणे पुनर्वसन होईपर्यंत मानधनाच्या स्वरूपात मदत दिली जाते.

- **महिलांना शिवणयंत्रे योजना:**

या केंद्रपुरस्कृत एकात्मिक ग्रामीण विकास योजना व समाजकल्याण विभाग यांच्यामार्फत ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांना शिवणयंत्रे मोफत पुरविण्यात येतात.

- **महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण योजना**

आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील इयत्ता दहावी पास झालेल्या महिलांना शासनमान्य प्रशिक्षण केंद्रातून पॅकिंग, टेलिफोन ऑपरेटर, टंकलेखक, नर्सिंग, आयटीआय मध्ये प्रशिक्षण देऊन शैक्षणिक दृष्ट्या स्वतःची पुनर्वसन करण्यासाठी शासनाकडून दरमहा रुपये शंभर विद्यावेतन देण्यात येते.

- **देवदासी पुनर्वसन योजना:**

या योजनेअंतर्गत १८ वर्षावरील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या देवदासी किंवा त्यांच्या मुलींना विवाहासाठी दहा हजार रुपये इतके अनुदान शासनाकडून दिले जाते. तसेच त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले जाते. त्यांना शालेय पुस्तके वह्या गणवेश इतर साहित्य घेण्यासाठी ५०० ते ६००रुपयांचे अनुदान शासनाकडून दिल्या जाते.

- **कामधेनु योजना:**

गरजू महिलांना घरच्या घरी काम मिळून त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी सर्व शासकीय तसेच निमशासकीय संस्थांना लागणाऱ्या वस्तू निर्मितीने ५०% काम नोंदणीकृत महिला संस्थांना देण्यात येते.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्यस्तरावर महिला मंडळ सहाय्यक अनुदान निरक्षर विधवांच्या मुलीसाठी विवाह अनुदान, अनाथ मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य, बहुउद्देशीय महिला केंद्रे, हुंडा दक्षता समिती, महिला व बालकल्याण समिती , शासकीय महिला

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

वस्तीगृहे, महिला संरक्षण गृहे, आधारगृहे, सुधारित माहेर योजना, तसेच स्टेप, नोराड, स्वाधार, पायलट प्रोजेक्ट अशा केंद्रीय स्तरावरही अनेक योजना राबविल्या जातात. शासनाकडून राज्यस्तरावर व केंद्रीय स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात. तसेच शहरी व ग्रामीण स्तरावर महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणा करीता अनेक स्वयंसेवी संस्था सुद्धा प्रभावीपणे आपली भूमिका पार पाडत आहेत. जसे बायफ मित्र, अफार्म, चैतन्य, पाणी फाउंडेशन, टाटा ट्रस्ट अशा अनेक संस्था ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात आपले योगदान देत आहे. महिलेला संपूर्णपणे स्वावलंबी होण्यासाठी देशातील प्रत्येक महिलेने जनजागृती केली पाहिजे. तरच महिला सक्षमीकरण योग्य मार्गाने होईल. आता वेळ आली आहे की महिला स्वतःचे निर्णय न घाबरता स्वतंत्रपणे घेऊ शकतात. आपण सर्वांनी महिलांच्या विचारांचा आदर करणे ही कुटुंबाची आणि समाजाची जबाबदारी आहे. महिलांच्या उन्नतीसाठी प्रत्येक व्यक्तीची सकारात्मक विचारसरणी, नवा दृष्टिकोन स्विकारल्यानेच समाजामध्ये परिवर्तन घडून येईल. महिला ह्या खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होतील.व समाज देखिल घडू शकेल.

जेव्हा स्त्री बाल्यावस्थेत असते तेव्हापासूनच तिचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे .प्रत्येक स्त्रीला ती स्वतंत्र असल्याची जाणीव करून देऊन तिला शिक्षणाचा हक्क जोपासण्यासाठी प्रवृत्ती केले गेले पाहिजे. जेव्हा एखादी स्त्री मानसिकदृष्ट्या सक्षम बनते तेव्हाच ती कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करू शकते. त्यासाठी महिलांना त्यांच्या कुटुंबाकडूनच साथ मिळाली पाहिजे. जेणेकरून ती आपल्या कार्यक्षेत्रात अजूनही पुढे जाऊन उंच झेप घेऊ शकेल. स्त्रीने आरोग्य सुदृढतेबरोबरच मानसिक सुदृढतेसाठी जागरूक राहावयास पाहिजे. त्यासाठी दररोज व्यायाम , शारीरिक कष्टाची कामे करणे आवश्यक आहे. तसेच दैनंदिन वावरतांना धाडसी व संयमी प्रवृत्ती स्विकारणे गरजेचे आहे. यामुळेच महिला शारीरिकदृष्ट्या सक्षम होईल. शिक्षण हे सर्वांगीण विकास करण्याचे साधन असल्यामुळे स्त्रीने शिक्षण घेवून तिचा बौद्धिक विकास देखिल केला पाहीजे. जेव्हा ती सक्षम होईल, समृध्द होईल, शिक्षणाद्वारे योग्य अयोग्य ठरविण्याची तिची क्षमता विकसीत होईल तेव्हा ती तिच्यावर होणाऱ्या वेगवेगळ्या ठिकाणावरील एखाद्या अन्यायाविरुद्ध लढा देईल तेव्हाच ती खऱ्या अर्थाने सक्षम झालेली असेल. त्यामुळे महिलांना समृध्द करणेसाठी तिच्या क्षमतांचा विकासासाठी सक्षमीकरण करण्याची नक्कीच आवश्यकता आहे.

**संदर्भसूची:**


- पाटील मनोज संकलन (२००८) नागरीकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकासाच्या योजना , पुणे : चौधरी लॉ पब्लिशर्स
- Gawande Virag ,Editor (Mar 2021) , Special Issues Womens Rights : Status & Goal : B.Aadhar , Peer Reviewed &

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

Refereed indexed ,Amravati: Aadhar Publications

- महिला धोरण , मुलगी झाली घरी लक्ष्मी आली, लोकमत वर्तमानपत्र , दि.१४ मार्च २०२३

*Cite This Article:*
* **डॉ. पवार द. द.**, *(2023).* महिला सक्षमीकरण शासन योजना : एक दृष्टिक्षेप , ***Educreator Research Journal, Volume–X, Issue– II**, March –April 2023, 254-259.*